ANNASAHEB AWATE COLLEGE, MANCHAR

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - X Issue - I January - March - 2021

ENGLISH / MARATHI / HINDI

Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.), M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

69

Scanned with CamScanner

VOLUME - X, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | आत्मनिर्भर भारतासाठी उद्योजगता शिक्षणाची भूमिका<br>**श्री. भोये चंद्रकांत मुरलीधर** | १-५ |
| २ | भारतीय कृषी अर्थव्यवस्था : आत्मनिर्भरतेकडे एक वाटचाल<br>**प्रा. डॉ. बिराजदार एस. एम.** | ६-९ |
| ३ | आत्मनिर्भयतेसाठी भारतामधील हरितक्रांतीचे योगदान<br>**प्रा. डॉ. गव्हाळे बी. व्ही.** | १०-१७ |
| ४ | आत्मनिर्भर भारत अभियान : परिणाम व आव्हाने<br>**प्रा. डॉ. अविनाश रामलाल निकम** | १८-२४ |
| ५ | भारताची सध्याची आर्थिक स्थिती आणि १९९१ चे आर्थिक संकट<br>**प्रा. डॉ. रहाणे शोभा तुकाराम** | २५-३० |
| ६ | भारत-चीन संबंध आणि आत्मनिर्भर भारत<br>**प्रा. डॉ. सुपेकर वैशाली प्रशांत** | ३१-३४ |
| ७ | भ्रष्टाचाराला आळा - डिजीटल इंडिया : कोविड-१९ च्या महामारी व त्यापुढील काळातील संधी<br>**डॉ. विकास वैजिनाथ टाचले** | ३५-३९ |
| ८ | आत्म-निर्भर भारतासाठी आत्म-निर्भर विद्यार्थी<br>**डॉ. एस. आर. चव्हाण**<br>**एम. आर. हिवाळे** | ४०-४२ |
| ९ | डिजिटल भारत आणि महिला सक्षमीकरण<br>**कु. संगिता साहेबराव बोरसे** | ४३-४६ |
| १० | आत्मनिर्भर भारत बनविण्यास शारीरिक शिक्षण व खेळाची भूमिका<br>**प्रा. अभय शरदराव चांदेकर** | ४७-५१ |
| ११ | आत्मनिर्भर भारत बनविण्यासाठी शिक्षणाची भूमिका<br>**श्री. अशोक माहुरे** | ५२-५४ |
| १२ | आत्मनिर्भर भारतासाठी लोकशाही व नागरी समाज<br>**प्रा. तानसेन यादवराव रणदिवे** | ५५-५७ |




70

Scanned with CamScanner

VOLUME - X, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# ६. भारत-चीन संबंध आणि आत्मनिर्भर भारत

प्रा. डॉ. सुपेकर वैशाली प्रशांत
विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग, अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर.

प्रस्तावना

भारताच्या आर्थिक क्षेत्रांमध्ये परिवर्तन करणारी एक मोठी घटना म्हणजे कोरोना महामारीच्या काळात केंद्र सरकारने घोषित केलेली योजना आत्मनिर्भर भारत होय.जागतिक व्यापारावर कोरोनाचा प्रभाव पडल्याने भारतातील ३३ क्षेत्रांवर गंभीर परिणाम झाले,त्यातूनच ▯आत्मनिर्भर भारत▯ या संकल्पनेचा जन्म झाला.या संशोधन पेपरमध्ये भारताने सुरू केलेल्या या मोहिमेचा भारताच्या चीन बरोबरच्या संबंधावर काय परिणाम होण्याची शक्यता आहे,चीन ची आक्रमकवादी भूमिकेवर ही योजना नियंत्रण ठरू शकेल काय? याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न या संशोधन लेखामध्ये करण्याचा प्रयत्न झाला आहे.भारत व चीन या दोन देशाच्या संबंधाचा विचार करता त्याला अनेक आयाम असलेले दिसून येतात.एकीकडे सीमावाद,पाकिस्तान आणि नेपाळ यांना हाताशी धरून भारताच्या विरोधातील कारवाया, गलवान खोऱ्यातील, पॅर्गोत्गत्सो मधील संघर्ष सुरू असताना दिसतो तर दुसरीकडे चीन बरोबर आपले व्यापारी हितसंबंध देखील असलेले दिसून येतात.त्यामुळे भारतासमोर दोन प्रश्न होते किंवा आहेत ते असे की, लष्करी पातळीवर चीन ला अटकाव करणे आणि दुसरीकडे चीन सोबत असलेले व्यापारी अवलंबीत्व कमी करण्यासाठी ठोस निर्णय घेणे,त्यासाठी देशांतर्गत पातळीवर सूक्ष्म,मध्यम आणि छोट्या प्रकल्पाचा विस्तार होणे गरजेचे होते.यासाठीच आत्मनिर्भर भारत ही संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे.

उद्देश

1. आत्मनिर्भर भारत ही संकल्पना समजून घेणे.
2. भारत-चीन संबंधाचा (व्यापारी क्षेत्र)विचार करणे.
3. या योजनेचा प्रभाव भारत-चीन परराष्ट्र धोरणावर कसा पडेल याचा विचार करणे.

आत्मनिर्भर भारत -आशय

आत्मनिर्भर भारत याचा अर्थ स्थानिक उद्योगांना प्रो.त्साहन देऊन त्यांना जागतिक दर्जा प्राप्त करून देणे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांना स्पर्धाक्षम बनविणे होय. भारताच्या पंतप्रधानांनी १२ मे २०२० रोजी आत्मनिर्भर भारत या योजनेची सुरुवात केली.या योजनेंतर्गत अनेक प्रकारच्या कर्ज सुविधा,सबसिडी, २०लाख करोडचे पॅकेज,**MSME** लोन,किसान क्रेडिट कार्ड,शिशुमुद्रा ऋण,**CLSS** अशा अनेक प्रकारच्या योजनांचा समावेश आहे.



71

Scanned with CamScanner

१९९० मध्ये भारताने जागतिकीकरण स्वीकारले आणि देशाची बाजारपेठ जगासाठी खुली केली.भारताचा विकास दर त्यानंतरच्या काळात सातत्याने ७% ते ८% पर्यन्त राहिलेला आहे.यामध्ये तब्बल ४०% योगदान भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे आहे.आत्मनिर्भर भारत या मोहिमेबाबत असा गैरसमज होऊ शकतो की, भारत आंतरराष्ट्रीय व्यापाराकडे पूर्ण पाठ फिरवू शकतो.परंतु भारत असे करणार नाही.उलट भारताकडे ज्या बाबी उपलब्ध आहेत,त्या बाबींना अधिक सामर्थ्यशाली बनविले जाईल.उदा. भारतात दक्षिणेकडील राज्यांमध्ये होजीअरी कपड्यांचा मोठा व्यवसाय आहे.भारत या उत्पादनाची मोठ्या प्रमाणात निर्यात करतो मात्र या होजीअरी साठी लागणारी बट्न्स, झिपर्स या दोन गोष्टी आपण चीन कडून आयात करतो.म्हणजेच याबाबतीत आपण चीनवर अवलंबून आहोत.अशा वेळी आपल्याला आपल्या देशातच बट्न्स, झिपर्स तयार करणे आवश्यक आहे. भारताला याबाबतीत आत्मनिर्भर बनावे लागेल.त्यासाठी स्थानिक पातळीवर त्याचे उत्पादन सुरू करणे आवश्यक आहे.

भारतात कापूस उत्पादन फार मोठ्या प्रमाणात होते,मात्र हा कापूस चीनला निर्यात होतो..२०१९-२० मध्ये १० लाख गाठी कापसाची निर्यात झाली.जानेवारी आणि फेब्रुवारी मध्ये सात लाख गाठीच्या निर्यातीचा करार झाला. चीन त्यापासून पक्का माल तयार करून मोठ्या प्रमाणात निर्यात करतो.अमेरिकेत ध्वज हे चीन कडून घेतले जातात मात्र ते भारताच्या कापसापासून तयार होतात.तसेच चीन मधून दक्षिण भारतातून फार मोठ्या प्रमाणात तांदूळ आयात केला जातो आणि तो तांदूळ नूडल्स,वाईन अशा उद्योगांमध्ये वापरला जातो.एवढेच नाही तर कोरोना महामारीच्या काळात थायलंड,व्हिएतनाम सारख्या देशांना तो निर्यात करून नफा मिळवतो.आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये ४० लाख टन बासमती तांदूळ आणि बिगर बासमती तांदूळाची ५० लाख टन निर्यात झाली.चीन मध्ये नव्या तांदळाला मागणी असते,नवा तांदूळ बाजारात आला की जुना तांदूळ आफ्रिकेला पाठविला जातो.याचाच अर्थ कापूस,तांदूळ किंवा इतर गोष्टीवर आधारित उद्योग भारतातच निर्माण झाले तर भारत स्वावलंबी बनेल.

भारत-चीन संघर्षाचे मुद्दे

भारत व चीन यांच्यामध्ये संघर्ष अनेक कारणामुळे असला तरी त्यातील मुख्य कारण सीमा वाद आहे.१९६२ च्या युद्धात चीनने भारताच्या भूमीत प्रवेश करून अरुणाचल प्रदेशावर आपला हक्क सांगितला. चीनला जगामध्ये महासत्ता बणण्याची महत्वाकांक्षा आहे.चीनच्या दक्षिणेला असलेल्या समुद्राला दक्षिण चीन उपसागर संबोधले जाते.या उपसागराच्या कडेला अनेक देश आहेत,जे अनेक काळापासून या समुद्रात वावरत आहेत.या वादग्रस्त उपसागरात चीनने आपले सार्वभौमत्व असल्याचा दावा केला आहे, आपल्या नौसेनेला तैनात करून इतर देशांना तिथे येण्यास बंदी घातली आहे.याची झळ भारतालाही बसत आहे.कारण व्हिएतनामने आपल्या हद्दीतील उपसागरात खनिज तेलाच्या शोधासाठी मदत मागितली आहे.चीनने भारताच्या नौकांच्या येण्याजाण्यावर आक्षेप घेतला आहे.जगात आपला प्रभाव आणि विस्तार वाढविण्यासाठी चीनने वन बेल्ट,वन रोड (ओबोर) ही योजना हाती घेतली आहे.यामुळे चीनला विविध



72

Scanned with CamScanner

देशांना व्यापारी महामार्गाने जोडण्याची संधी मिळणार आहे. दळणवळणाचे विस्तृत जाळे उभारून जागतिक व्यापाराला अधिक उत्तेजन देण्याचा हेतु यामागे आहे, असे चीनने म्हटले आहे.ओबोर या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी चीन सुमारे चारशे अब्ज डॉलर गुंतवणूक करणार आहे. युरोप, आशिया, आफ्रिका या खंडाना जोडन्यासाठीच्या व्यापक प्रकल्पासाठी निधि उपलब्ध करून देणे अन्य कोणत्याही देशांना शक्य नाही.जगातील एकमेव महासत्ता बनण्याचा चीनचा हेतु यात आहे.ओबोरचे भूमार्ग आणि सागरी मार्ग असे दोन महत्वाचे भाग आहेत. हे दोन्ही पाकिस्तानमध्ये एकत्र येतात,म्हणून भारताच्या सामरिक सुरक्षेला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

भारत एक आशियाई महासता असल्यामुळे चीनचे आव्हान आपल्यासाठी अधिक महत्वाचे आहे. भारताची सर्वात मोठी उणीव म्हणजे संथ गतीने होणारा विकास आणि त्याला जोडलेला सामरिक क्षेत्रात स्वयंपूर्णतेचा अभाव हा आहे. अशा परिस्थितीत आर्थिक क्षेत्रात सुधारणा करू शकणारी 'आत्मनिर्भर भारत' ही मोहीम भारताचे बळ वाढविणारी आहे.प्रगत औद्योगिक क्षेत्रात विशेष महत्वाच्या स्ट्रेटेजिक उद्योगात चीनवरील अवलंबीत्व कमी करणे अत्यंत आवश्यक होते. आत्मनिर्भरतेची योजना अमेरिका, जर्मनी, दक्षिण कोरिया, चीन या देशांनीही राबवविलेली आहे. जर्मनी या देशाने तर योग्य ती धोरणे राबवून वाहन उद्योगाला प्रचंड बळकटी दिली आहे. दक्षिण कोरियाच्या जिडीपी मध्ये स्थानिक उद्योगांचा वाटा तब्बल ७०% इतका आहे. होम अप्लायन्सेस मध्ये दक्षिण कोरियाशी स्पर्धा करणारा दूसरा देश नाही. भारताला देखील पक्का माल बनविण्यासाठी अशा प्रकारच्या उद्योगांना बळकटी देणारे धोरण राबविणे आवश्यक होते, कारण भारतात अजूनही ३०% दारिद्र्य आहे, ते हटविणे आवश्यक आहे.

## निष्कर्ष

बदलत्या वैश्विक वास्तवतेची चाहूल म्हणजे आत्मनिर्भर भारत ही योजना आहे.लोकल ते व्होकल या अंतर्गत स्थानिक उत्पादने व उत्पादनांना निश्चितच प्रेरणा मिळणार आहे.या मोहिमेला आंतरराष्ट्रीय संदर्भ आहे असे म्हणता येईल.पिपीई किट्स,चांगली यंत्रे,मुखावरणे,हायड्रोक्लोरोक्वीन च्या गोळ्या आपण इतर देशांना पुरविल्या.नेपाळ,पाकिस्तानला पुढे करीत चीन भारतासोबत जे राजकारण करत आहेत,त्या पार्श्वभूमीवर आत्मनिर्भरता अभियान सुरू करणे आवश्यक होते.याचा संबंध केवळ आंतरराष्ट्रीय राजकारनाशी नाही तर देशांतर्गत विषयांमध्येही आत्मनिर्भरता आवश्यक आहे.उत्तरप्रदेश सारख्या राज्याने 'एक जिल्हा,एक उत्पादन' हे सूत्र समोर ठेऊन स्थानिक कारागिरीला प्रोत्साहन देण्याचा जो उपक्रम सुरू केला आहे,ते आत्मनिर्भरतेच्या दिशेने जाणारे आहे.या योजनेला बळकटी आणण्यासाठी स-कुशल मनुष्यबळ,उद्योगाना द्याव्या लागणाऱ्या सोयी-सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे.महात्मा गांधीजींनी 26 जुन 1924 च्या 'यंग इंडिया' च्या अंकात जे म्हटले होते,ते एकप्रकारे आत्मनिभरतेच्या धोरणाचे मर्म आहे.ते असे म्हणाले होते, "भारतीय संस्कृतीची प्रतिभाशक्ती आबाधित राखणे,हीच माझी स्व-राज संकल्पना आहे".



73

Scanned with CamScanner

संदर्भ

1. Mahua Das- India, china and Pakistan, The estranged neighbours of south Asia?,IOSR journals of Humanities and Social Sciences,Vol-15,Issue-5(sept-oct 2013), e-ISSN-2279-0837.
2. आनंद प्रतापसिंह -वैश्विकरण के बाद भारत-चीन संबंध, https://www.researchgate.net /publication/271447537_vaisvikarana_ke_bada_bharata-_cina_sambandha.
1Trilok kumar jain- Self-Reliant IndiaCampaign,Research Gate (2020)
3. गुलशनकुमार वनकर- आत्मनिर्भर भारत ही संकल्पना जागतिकीकरणाच्या अस्ताकडे जाणारी आहे का?
4. India and China: Towards Self-Reliant Economies: A broad comparison of the strengths and weaknesses of the two economies, SAGE journals.
5. सिंग राजेश कुमार- भारत-चीन संबंध,VBS, Purvanchal University, http://hdl.handle.net/10603/170208.
6. The Economics Times of Hindi- आत्मनिर्भर भारत अभियान के बारे मे ये जरूरी बाते जानते है आप? 15 May 2020.
7. परिमल माया सुधाकर- भारतापुढील आव्हाने व उपाययोजना, लोकसत्ता, 7 मे २०१६.
8. लोकमत न्यूज नेटवर्क-आत्मनिर्भर भारताला चीन विरुद्ध अशी द्यावी लागेल लढत,११ जुलै २०२०.



74

Scanned with CamScanner